सहा.पोलीस निरीक्षक नरडाणा पोलीस स्टेशन

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** नरडाणा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0003 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/01/2026 20:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 06/01/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/01/2026

**Time From (वेळेपासून):** 10:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/01/2026 **Time (वेळ):** 20:08 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 013

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/01/2026 20:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पिंप्राड रोड ,म-रा-वि-विसबस्टेशन प्रवेशव्दार, नरडाणा ,शिंदखेडा जि-धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पदमावती मधुसुदन कलाल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे ,नरडाणा ,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे ,नरडाणा ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | साहिल मेहमुद मन्यार | | | 1. वर्षी ,ता- शिंदखेड जि-धुळे , नरडाणा ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराची 01 नोट | 500.00 |

निरीक्षक
स्टेशन



**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पदमावती मधुसुदन कलाल, वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देते की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे सहा महिन्यांपासुन कार्यरत आहे. आज रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी तक्रारदार भटेश अशोक सिसोदे यांनी त्यांच्याकडे नरडाणा येथील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची माहिती दुरध्वनीद्वारे कळविल्याचे सांगुन आम्हास नरडाणा येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन पुढील कार्यवाही करण्यास आदेशित केले. त्याप्रमाणे आम्ही जिल्हा हिवताप कार्यालय, धुळे येथील दोन शासकिय कर्मचारी उत्रेश्वर कावळे, आरोग्य निरीक्षक व कमलेश पाटील, आरोग्य सेवक यांना उपलब्ध करुन घेवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी कार क्रमांक एम.एच.18 बीआर 1934 ने रवाना होवुन नरडाणा येथील मेलाणे गांव रस्त्यालगत तक्रारदार यांच्या शेतात पोहोचलो. तेथे आम्हास ठरल्याप्रमाणे तक्रारदार यांची भेट झाली. तेव्हा त्यांनी आम्हास पंचांसमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकिगत सांगुन त्यांची तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे ''माझी सख्खी बहिण नामे सौ. गितांजली संतोष साळुंखे हि आमचे एकत्रित कुटुंबात राहत असुन तिने नरडाणा येथील गांधी चौकात ग्रामपंचायतीच्या जागेतील दुकानात ब्युटी पार्लरचा व्यवसाया करीता वाणिज्य विज कनेक्शन मिळणेकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे ऑनलाईन अर्ज केला होता. मी दिनांक 24.12.2025 रोजी विज कनेक्शनचे कोटेशन भरुन आवश्यक ते कागदपत्र म.रा.वि.वि. कंपनी, नरडाणा उपविभाग कार्यालयात जमा केले होते. बहिणीचे विज कनेक्शन जोडणीकरीता मी वेळोवेळी सदर कार्यालयात जावुन तेथे हजर असलेले विज कर्मचाऱ्यांची भेट घेवुन पाठपुरावा करीत होतो.
त्यानंतर आज दि.06.01.2026 रोजी सदर कार्यालयाचे वायरमन मन्यार यांनी बहिणीच्या दुकानात विज मिटरची जोडणी करुन देवुन वायरमन मन्यार यांनी माझया आईच्या फोनवरुन मला फोन करुन विज मिटर बसविण्याच्या मोबदल्यात 500/- रुपये द्यावे लागतील, नाहीतर कनेक्शन कट करुन टाकेल असे मला सांगितले. तेव्हा मी त्यांना दुपारी 02:00 वाजता भेटण्यास येतो असे सांगितले आहे. मला वायरमन मन्यार यांच्या मागणी प्रमाणे त्यांना 500/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. माझा त्यांचे सोबत कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वादविवाद नाही.
मी आज दि.06.01.2026 रोजी दुपारी वायरमन मन्यार यांना भेटण्यास शिंदखेडा रोडवरील पिंप्राड गावातील म.रा.वि. वितरण कंपनीच्या कार्यालयात जाणार आहे. तेव्हा वायरमन मन्यार यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.'' सदर तक्रारीमधील मजकुर व तक्रारदार यांनी केलेली तक्रारीची तोंडी हकिगत सारखीच असल्याने सदर तक्रारी अर्जावर व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.
त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरुन स्पिकर सुरु करुन बाहयस्त्रोत तंत्रज्ञ साहिल मेहमुद मन्यार यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन कोठे येवु बाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांना पिंप्राड येथील सबस्टेशन येथे येण्यास सांगितले.
त्याप्रमाणे तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचांना सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना तंत्रज्ञ मन्यार यांची भेट घेण्यासाठी पिंप्राड येथील सबस्टेशन येथे पंच नं. 01 कावळे यांचेसह तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम.एच. 19 ईके 0690 ने रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच कावळे असे तंत्रज्ञ मन्यार यांची भेट घेवुन काही वेळाने आमचे जवळ परत आले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 कावळे यांना तक्रारदार व तंत्रज्ञ मन्यार यांच्या भेटीची हकिगत विचारली असता, त्यांनी तंत्रज्ञ मन्यार व तक्रारदार यांचेत पिंप्राड येथील सबस्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ भेट झाली. तेव्हा तंत्रज्ञ मन्यार यांनी तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा करुन फोनवर सांगितल्याप्रमाणे तुम्हाला 500/- रुपये द्यावे लागतील असे सांगुन तक्रारदार

यांच्याकडे 500/- रुपये लाचेची मागणी केल्याची हकिगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित झालेले तंत्रज्ञ मन्यार व तक्रारदार यांचेतील संभाषण ए्ेकुन तंत्रज्ञ मन्यार यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने आम्ही तंत्रज्ञ मन्यार याचेवर सापळा लावण्याचा निर्णय घेतला.
त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करुन तक्रारदार यांच्याकडुन 500/- रुपये दराची 01 नोट असे 500/- रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटेस पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 कावळे यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन त्यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने पिंप्राड सबस्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही खाजगी वाहनाने जावुन सबस्टेशनच्या परिसरात सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी सबस्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळुन त्यांना ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने तंत्रज्ञ मन्यार यांना ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 कमलेश पाटील यांनी तंत्रज्ञ मन्यार यांच्या शर्टाच्या डाव्या खिशातील 500/- रुपयाची लाचेची रक्कम ताब्यात घेतली. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशाप्रकारे लोकसेवक साहिल मेहमुद मन्यार, वय 21 वर्षे, तंत्रज्ञ (बाहयस्त्रोत), उपविभाग नरडाणा, ग्रामीण कक्ष क्र. 01, ता. शिंदखेडा, जि. धुळे, रा. वर्षी, ता. शिंदखेडा. जि. धुळे यांनी तक्रारदार भटेश अशोक सिसोदे यांच्या बहिणीचे ब्युटी पार्लरचे नविन विज कनेक्शन जोडुन देण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडुन 500/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पिंप्राड, ता. शिंदखेडा येथील सबस्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

NILESH RAMESHSING MORE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** NILESH RAMESHSIN

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**